# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**मुंबई-गोवा महामार्गावरील पूलांच्या रुंदीकरणाबाबत**

**(१) ५७७ (२२-१२-२०१४). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गावरील पूल व पूलांच्या रुंदीकरणाबाबत सन २०१०-११ च्या वार्षिक आराखड्यात शासनाने कोणत्या पूलांच्या रुंदीकरणाचा प्रस्ताव दाखल केला आहेत व त्या प्रस्तावाची २०१४-१५ या वर्षात सद्य:स्थिती काय आहे,

(२) असल्यास, उक्त महामार्गावरील बहूतेक पूल ब्रिटीशकालीन असून राष्ट्रीय महामार्ग मानकापेक्षा अरुंद आहेत ही बाब खरी असताना स्वातंत्र्यानंतर ६७ वर्षे होऊनही या पूलाच्या रुंदीकरणाबाबत शासनाने कोणतीही कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, जगबूडी व भनसल या पूलाच्या रुंदीकरणाबाबत संकल्पचित्र तयार न करण्यामागील कारणे काय आहेत अथवा त्या मागील सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, राष्ट्रीय महामार्गावर करण्यात येणार पूलांचे/ मो-यांचे रुंदीकरण/पूर्नबांधणी इ. कामे क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून विनिर्देशानुसार होत असताना या कामांबाबत शासनाला वारंवार खर्च करावा लागत आहे तसेच कामाचा दर्जा तपासला जातो काय, असल्यास पाहणी अहवाल केव्हा सादर करणार,

(५) सन २००९ ते २०१३ पर्यंत राष्ट्रीय महामार्गावर झालेल्या अपघातांची संख्या किती आहे त्यात मरणात्मक अपघात, गंभीर अपघात व किरकोळ अपघातांची संख्या व टक्केवारी किती आहे,

(६) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गावर पनवेल, महाड व पणजी येथे अपघातात जखमी झालेल्यांवर तातडीने उपचार करण्यासाठी २० रुग्णांच्या क्षमतेचे ट्रामाकेअर रुग्णालय उभारण्याची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०७-२०१७) :**(१) सन २०१०-२०११ च्या मंजूर वार्षिक आराखडयात राष्ट्रीय महामार्ग क्र १७ वरील चार पुलांच्या पुनर्बांधणीचा समावेश करण्यात आलेला होता.

त्यापैकी जगबुडी (खेड), पिठढवळ (कुडाळ) व वशिष्ठी पूलाचे काम चौपदरीकरणामध्ये प्रगतीपथावर आहे.

भंगसाळ (कुडाळ) पुलाचे काम चौपदरीकरणामध्ये समाविष्ट असून भूसंपादनानंतर हाती घेण्यात येणार आहे.

(२) सदर बाब पूर्णत: सत्य नसून काही मोठे पूल वगळता ब-याच प्रमाणात लहान पूल, व मो-यांची रुंदीकरणाची (दोन पदरी करण्याची) कामे मागील १५ वर्षात झालेली आहेत.

(३) जगबुडी नदीवर दुपदरी धावपट्टीच्या दोन पूलांचे काम प्रगतीत आहे. तसेच भंगसाळ येथील जुना पूल पाडून त्याच जागेवर ४ मार्गिकेचा नवीन पूल मुंबई गोवा चौपदरीकरणाच्या कामात समाविष्ट आहे.

(४) राष्ट्रीय महामार्गावरील पूलाची कामे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार क्षेत्रिय अधिकारी करुन घेतात.

(५) अपर पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार सन २००९ ते २०१३ या कालावधीमध्ये ६०,८७५ अपघात घडले असून, त्यामध्ये मरणांतक अपघात १५,२२७ (२५%), गंभीर अपघात १४५४४ (२३.८९%) तर किरकोळ अपघातांची संख्या १२७९९ (२१.०२%) इतकी आहे.

(६) या महामार्गावर कि.मी. १२५/१०० (महाड) येथे व कि.मी. २५९/४०० शास्त्री पूल या ठिकाणी ट्रामाकेअर रुग्णालय कार्यरत आहे.

---

## कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासींची फसवणूक केल्याबाबत

**(२) १५८५४ (१०-०४-२०१५). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील आदिवासींना शासनातर्फे कसण्यासाठी देण्यात आलेल्या जमिनीवर तेथील स्थानिक विकासकांनी आदिवासींची फसवणूक करुन अनधिकृत चाळी उभारल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित विकासकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१७) :**(१), (२) व (३) कल्याण तालुक्यातील मोजे घोटसई येथील स.नं. ३५, ३६ व ३७ मौजे गुरवली येथील ९५/१, ९७/२, ८६ व ८९ मौजे जांभुळ मोहीली येथील स.नं. २३/२ब आणि २२/१ब व मौजे नडगांव येथील स.नं. ११ या शासनातर्फे आदिवासींना कसण्यासाठी देण्यात आलेल्या जमिनीवर चाळींचे बांधकाम केल्याचे निदर्शनास आल्याने उक्त जमिनींवरील बांधकामे निष्कासित करण्यात आली असून सदर जमिनींचा गाव नमुना नंबर ७/१२ आदिवासींच्या नावे आहे.

तसेच, कल्याण तालुक्यातील मौजे मांडा येथील स.नं. २३२/२ या जमिनीमध्ये आदिवासी यांनी स्वत: बांधकाम केले असून सदर जमिनीचा ताबा आदिवासी खातेदाराकडे आहे.

---

**मुंबई वडाळा (पूर्व) येथील झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३) १८३०१ (११-०८-२०१५). श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई वडाळा (पूर्व) येथील गणेशनगर, बरकत अली रोड व मिठागर या ठिकाणच्या ३४५ बाधित आदिवासी पारधी झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करावे अशी मागणी आदिवासी पारधी समाजाने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या झोपडपट्टीधारकांनी सन २००३ मध्ये मुंबईतील आझाद मैदानात धरणे धरले होते व त्यात उपोषण स्थळी ४ इसमांचा मृत्यु झाला होता, त्याची दखल घेवून शासनाने या झोपडपट्टीधारकांना कल्याण (जि.ठाणे) येथील शिरढोण गावात घरांसाठी भूखंड व काही रक्कम मंजूर केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या भूखंडाचे झोपडपट्टीधारकांना हस्तांतरण करण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्यांना हस्तांतरण केव्हा करण्यात येईल ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) मौजे शिरढोण ता.कल्याण, जि.ठाणे येथील स.नं. ९५, ८६ व १३३ मधील जमिनीचे रेखांकन करुन प्रत्येक झोपडपट्टीधारकास १४ चौ.मी. या प्रमाणे सर्व ३४५ झोपडपट्टीधारकांस एकूण ४८३० चौ.मी. क्षेत्र व अन्य सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी ३० टक्के अतिरिक्त क्षेत्र म्हणजेच १४४९ चौ.मी. क्षेत्र सन २००८ च्या बाजारमुल्य दराने भोगवटामुल्य तसेच विकसन शुल्काची आकारणी करुन प्रत्येक झोपडपट्टीधारकाकाडून शासन जमा करण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दिनांक १५/०६/२०११ च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आले असून सदर प्लॉटचा ताबा दिनांक ०५/०२/२०१४ रोजी सर्व संबंधित झोपडपट्टीधारकांना देण्यात आला आहे.

---

**तिवसा (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील भोगवटदार वर्ग-२ च्या जमिनी भोवटदार वर्ग-१ करण्याबाबत**

**(४) ३८१३९ (०८-०१-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (ता.तिवसा, जि.अमरावती) येथील भोगवटदार वर्ग-२ च्या जमिनी भोवटदार वर्ग-१ करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांना निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनानुसार उक्त भोगवटदार वर्ग-२ च्या जमिनी भोगवटदार वर्ग-१ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही कली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०७-२०१७) :**(१) या संदर्भात लोकप्रतिनिधींनी दि. ०४/०६/२०१५ चे पत्रान्वये जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या कार्यालयाकडे विनंती केली आहे.
(२) व (३) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २९(२) अन्वये विवक्षित भुमिधारी यांना वर्ग-१ मध्ये अंर्तभाव करण्यासाठी तरतुद असून महाराष्ट्र जमीन महसूल (विवक्षित भुमिधारकांना भोगवटदार वर्ग-१ मध्ये अंतर्भाव करण्यासाठी) परवानगी देण्याबाबत नियम १९६८ मधील नियम-५ नुसार “अनिर्बंधित भुमीधारी” स्वरुपाच्या जमिनीचे रुपांतर वर्ग-१ जमिनीमध्ये होऊ शकते, इतर जमिनीचे रुपांतरण वर्ग-१ मध्ये होत नाही असे लोकप्रतिनिधीं यांना उपविभागीय अधिकारी, तिवसा-भातकुली यांच्या दि. ३०/०७/२०१५ चे पत्रान्वये कळविले आहे.

---

### जे.एन.पी.टी (ता.उरण, जि.रायगड) येथील एसएच.५४ हा जेएनपीटीच्या रेल्वे क्रॉसिंगचा मार्ग खुला करणेबाबत

**(५) ३९६८३ (१३-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जे.एन.पी.टी (ता.उरण, जि.रायगड) परिसरात नागरी वाहनांसाठी एसएच.५४ हा जेएनपीटीच्या रेल्वे क्रॉसिंगचा मार्ग खुला करणे तसेच सर्व्हीस रोड (स्वतंत्र मार्गिका) तयार करुन वाहतूक कोंडीवर व तेथे होणाऱ्या असंख्य जीवघेण्या अपघातांना रोखण्यासाठी उपाययोजना करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १९ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा. मुख्यमंत्री यांना दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणता निर्णय घेतला व त्याचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-०७-२०१७) :**(१) व (२) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले नसल्याचे मुख्य महाव्यवस्थापक, सिडको यांनी कळविले आहे.

तथापि, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने हाती घेतलेल्या जे.एन.पी.टी. कडे जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ५४ राष्ट्रीय महामार्ग ४ ब यांच्या रुंदीकरणाच्या प्रकल्पामध्ये ५ ठिकाणी रेल्वे उड्डाणपूल बांधण्याचा समावेश असून सदरील काम मे, २०१८ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पनवेल यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औरंगाबाद जिल्हयात सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागातर्गत अनेक अवैध कामे झाल्याबाबत**

**(६) ४२२३४ (२९-०४-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागांतर्गत अनेक कामे अवैध झाल्याचा आरोप बीड जिल्ह्यातील माजलगांव पंचायत समिती सदस्य श्री.सुशील सोळंके यांनी चौकशी करण्याची मागणी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यश कन्स्ट्रक्शन कंपनी लातूर या कंपनीने बीड जिल्ह्यासह मराठवड्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये अवैध कामे केल्याचा आरोप केल्याप्रकरणी शासन चौकशी करुन कोणती आवश्यक कार्यवाही करणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०७-२०१७)** :(१) होय. हे खरे आहे.

(२) यश कन्स्ट्रक्शन कंपनी यांनी केलेल्या कामांची तपासणी अधिक्षक अभियंता दर्जाच्या अधिका-यांनी केली असता कोणतीही आक्षेपार्ह बाब आढळून आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील माझगांव येथील भाडेपट्टा संपलेल्या भूखंडाची बेकायदा नोंदणी केल्याबाबत**

**(७) ४४२७३ (२०-०४-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगांव येथील सीएसक, १२६ मधील ८७१४ चौ मीटर भाडेपट्टा संपलेल्या भूखंडाची शासनाची परवानगी नसतांना बनावट दस्ताऐवजच्या आधारे दिनांक २५ मे, २०१०

रोजी वा त्यासुमारास बेकायदा नोंदणी केलेल्या मालमत्तेची नोंदणी रद्द करणेबाबत, दिनांक १९ जानेवारी, २०१५ रोजी सुनावणी घेण्यात येवूनही सदर प्रकरण अंतिम निर्णयासाठी नोंदणी उपमहानिरीक्षक मुंबई विभाग यांचेकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने प्रलंबित असलेल्या प्रकरणावर त्वरीत निर्णय देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०७-२०१७) :** (१) नोंदणी उपमहानिरीक्षक, मुंबई विभाग, मुंबई यांनी सदर प्रकरण त्यांच्या कार्यालयाच्या स्तरावर निकाली काढले आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आचरा (जि.सिंधुदूर्ग) येथील जमिन फेरफारातील चूकीच्या केलेल्या नोंदी सुधारण्याबाबत**

**(८) ४६५१५ (२०-०४-२०१६). श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आचरा (जि.सिंधुदूर्ग) येथील जमिन फेरफारातील चूकीच्या केलेल्या नोंदी सुधारण्याच्या मागणीसाठी आचरावासीयांनी दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जमिन फेरफारातील चुकीच्या केलेल्या नोंदी सुधारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०७-२०१७) :**(१) आचरा हे रत्नागिरी जिल्ह्यात नसून सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यात आहे. आचरा येथील ग्रामस्थांकडून त्या स्वरुपाची मागणी आहे.
(२) (३) व (४) देवस्थान इनामांच्या जमिनी वहिवाटदारांच्या नावावर करण्याबाबतचे धोरण अस्तित्वात नाही. देवस्थान जमिनी संदर्भात शासनाने प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती नेमली असून सदर अभ्यास समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर या संदर्भात उचित धोरणात्मक निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

---

**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेंतर्गतच्या रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत**

**(९) ५०३३० (०३-०५-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी-निजामपूर महानगरपालिके अंतर्गतच्या रस्त्यांची दुरवस्था झाली असून सदर रस्त्याचे सिमेंट कॉंक्रिटीकरण करण्यासाठी विशेष अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी भिवंडी (पूर्व) यांनी मा.मुख्यमंत्री व आयुक्त, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भिवंडी महानगरपालिकेला रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी विशेष अनुदान देण्याबाबत मा.मुख्यमंत्री यांनी भिवंडी येथील वंजारपट्टी पुलाच्या उद्घाटनांच्या वेळी घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार भिवंडी महानगरपालिका हद्दीतील मुख्य रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०७-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) रस्ते, वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या मान्यतेनुसार भिवंडी महानगरपालिका हद्दीतील अंजूरफाटा ते वंजारपट्टी हया सुमारे ४.५ कि.मी. जुन्या राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरी कॉंक्रीटमध्ये रुपांतर करण्याचे रु.३८.६४ कोटी किंमतीचे काम हाती घेण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कच्छी लोहाना ट्रस्ट, सीएसक्र.१२६ मधील भाडेपटटा संपुष्टात आलेली शासकीय जमीन ताब्यात घेणेबाबत

**(१०) ५३७८३ (१९-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शिवदास चापसी मार्ग, कच्छी लोहाना ट्रस्ट, सीएसक्र.१२६ मधील भाडेपटटा संपुष्टात आलेली व शासनाने घोषित केलेली १३९९.६६ चौ.मी. शासकीय जमीन ताब्यात घेणेबाबत जिल्हाधिकारी मुंबई शहर यांनी, कच्छी लोहाना ट्रस्ट आणि गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांना दिनांक १५ जानेवारी, २०१३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून देखील, सदरहू जमीन अद्याप शासनाने ताब्यात घेणेबाबत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन परवानगी न घेता अवैधरित्या हस्तांतरीत झालेली जमीन अद्याप शासनाने ताब्यात न घेण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या संदर्भात लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.मुख्य सचिव व मा.प्रधान सचिव महसूल यांना दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी लेखी निवेदन दिले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०७-२०१७) :**(१), (२), (३), (४) व (५) सदर प्रश्नातील मुद्याच्या अनुषंगाने मा.लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मुख्य सचिव व प्रधान सचिव (महसूल) यांना दि.०३.०३.२०१६ रोजी लेखी निवेदन दिले आहे.

माझगांव येथील नवीन सर्व्हे नं.२/३६०५ मधील शासकीय जमीन भाडेपट्टाकराराने दि.१.९.१९०३ पासून दि वुमेन्स फॉरेन मिशनरी सोसायटी ऑफ दि मेथॉडीस्ट ऑपिस्कोपल चर्च यांना ९९ वर्षांकरीता भाडेपट्टयाने देण्यात आलेली होती. सदर जमीन दि.२३.८.१९१८ रोजी दि वुमेन्स फॉरेन मिशनरी सोसायटी ऑफ दि मेथॉडीस्ट ऑपिस्कोपल चर्च यांनी श्री. कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट यांना भाडेकराराद्वारे (Deed of Assignment) दिली. त्याच दिवशी एका स्वतंत्र खरेदीखताद्वारे उक्त सोसायटीने नवीन सर्व्हे क्र. १/३६०५ व ३/३६०५ हे भूखंड देखिल श्री.कच्छी लोहाणा निवास गृह ट्रस्ट यांना विकले. नगर भूमापनाच्यावेळी उक्त नवीन सर्व्हे क्र.२/३६०५ याचे सर्व्हे क्र.१/३६०५ व ३/३६०५ यांच्यासह रुपांतरण भूकर क्र.१२६ मध्ये झाले व श्री. कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट यांनी सदर भूकर क्र. १२६ मे. गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांना दि.२४.५.२०१० च्या खरेदी खताने विकल्याचे निदर्शनास आलेले आहे. त्यावेळी मुळ सर्व्हे नं.२/३६०५ याची भाडेपट्टयाची मुदत संपलेली होती.

जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालयाकडून श्री. कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट व मे.गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स यांचे विरुद्ध भायखळा पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद केलेला आहे. तसेच याबाबत शासनास प्राप्त अहवाल तपासण्यात येत आहे.

___________

### राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ च्या चौपदरीकरणासाठी संपादीत केलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना कमी-जास्त दराने दिल्याबाबत

**(११) ५५५७७ (२४-०८-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील भूम-परांडा-वाशी विधानसभा मतदार संघातील राष्ट्रीय महामार्ग २११ च्या चौपदरीकरणाचे काम आयआरबी कंपनीमार्फत चालू आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या चौपदरीकरणाच्या कामासाठी शेतकऱ्यांच्या जमीनी संपादीत करण्यात आल्या आहेत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी रस्त्याच्या कामासाठी घेण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी काही शेतकऱ्यांना कमी-जास्त दराने जमिनीचा मावेजा (मोबदला) देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांना योग्य मोबदला देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक ६ जून, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०७-२०१७) :**(१) होय हे खरे आहे.

(२) होय हे खरे आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ च्या चौपदरीकरणासाठी शेतकऱ्यांच्या जमीनी संपादीत करण्यात आल्या आहेत.

(३) होय हे खरे आहे, तथापि, राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मधील तरतुदीनुसार ३ A प्रसिध्दीकरणाच्या विक्री व्यवहार उपलब्ध करून घेऊन त्यांची सरासरी व ३ A प्रसिध्दीकरण वर्षाचे शिघ्रसिध्द गणकाचे दर यामधील उच्चतम येणारे दर बाजार मूल्य म्हणून निश्चित करण्यात आलेले आहे. तसेच, शिघ्रसिध्द गणकाचे दर व खरेदी विक्री व्यवहार गावनिहाय वेगळे असल्याने बाजार मूल्य गावनिहाय वेगवेगळे निश्चित करण्यात आलेले आहे.

तसेच, राष्ट्रीय महामार्ग क्र.२११ च्या चौपदरीकरणासाठी संपादीत करण्यात आलेल्या जमीनीचे दर राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ मध्ये नमूद असलेल्या तरतुदीनुसार निश्चित करण्यात आलेले आहे. दि. १.०१.२०१५ नंतर घोषीत करण्यात आलेल्या निवाड्यास भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळणे व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम २६ ते ३० नुसार बाजार मूल्य निश्चित करण्याच्या सूचना असल्यामुळे दि. १.०१.२०१५ नंतर घोषित करण्यात आलेले सर्व निवाडे नविन कायद्यातील तरतुदीप्रमाणे घोषित करण्यात आलेले आहेत. तसेच, दि. ३१.१२.२०१४ पूर्वी जे निवाडे घोषित करून ५० टक्के संपादीत क्षेत्राचा मावेजा वाटप करण्यात आलेला नाही असे निवाडे भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळणेचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम २४(२) नुसार सदर निवाडे नवीन भूसंपादन कायद्याच्या कलम २६ ते ३० नुसार सुधारीत करण्याचे निर्देश प्राप्त झालेले असल्याने दि. ३१.१२.२०१४ पूर्वी अंतिम निवाडे घोषित करून ज्या प्रकरणामध्ये ५०% पेक्षा कमी वाटप झालेले आहे अशी प्रकरणे सदर तरतुदीनुसार सुधारीत करण्यात आलेली आहेत.

(४) होय हे खरे आहे.

(५) उस्मानाबाद जिल्ह्यातील १००.७६ हेक्टर क्षेत्राचे भूसंपादनाचे निवाडे घोषित झाले असून भूसंपादन अधिकारी यांचेकडे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने रू. २३७.८२ कोटी इतका निधी जमा केला असून त्यापैकी भूधारकांना रू. १३६.१८ कोटी मावेजा वाटप करण्यात आला आहे.

शेतकऱ्यांना देण्यात आलेला मोबदला राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ व भूसंपादन अधिनियम १८९४, भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळणे व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ या मधील तरतुदी विचारात घेऊन निश्चित करण्यात आलेला आहे.

अर्जदारांना मोबदला मान्य नसल्यास राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत अर्जदार लवादाकडे अपील करू शकतील अशी कायद्यात तरतूद आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**साक्री (जि.धुळे) तालुक्यातील पिंपळनेर-नवापाडा-पुनाजीनगर कुत्तरखांब-पवारवाडा ते रोहोड या रस्त्याची झालेली दुरवस्था**

**(१२) ५६१७३ (२४-०८-२०१६). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) साक्री (जि.धुळे) पिंपळनेर-नवापाडा-पुनाजीनगर कुत्तरखांब-पवारवाडा ते रोहोड या २० कि.मी. लांबीच्या अत्यंत महत्वाच्या रस्त्याची दुरवस्था होऊन रस्ता वाहतुकीस त्रासदायक झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरचा रस्ता दुरुस्त व्हावा म्हणून माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान परिसरातील कृती समितीने याबाबतीत जिल्हाधिकारी, धुळे, पोलीस अधिक्षक, धुळे, कार्यकारी अभियंता, सा.बां.धुळे यांना निवेदन दिले असुनही अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यवाही करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०७-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

प्रश्नाधीन पिंपळनेर-नवापाडा पुणाजीनगर कुत्तरखांब- पवारपाडा -रोहोड या रस्त्याची लांबी २०.०० किमी नसून १६ किमी इतकी आहे. या रस्त्याच्या पृष्ठभागापैकी ९.५०० किमी लांबी क्षतिग्रस्त झाली आहे.
(२) व (३) पिंपळनेर, टेंभा, रोहोड रस्ता संघर्ष समिती टेंभा प्र.वार्से ता.साक्री, जि.धुळे यांनी मा.विधानसभा सदस्य, साक्री विधानसभा यांना दिनांक १६.५.२०१६ रोजी दिलेल्या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, धुळे, यांचेकडून कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) विभाग, धुळे यांना प्राप्त झाली आहे. तसेच सदर निवेदन पोलीस अधीक्षक, धुळे यांना पृष्ठांकित केले आहे.

प्रश्नाधीन रस्त्याच्या ९.५०० किमी क्षतिग्रस्त लांबीपैकी ५.६०० किमी लांबीचे काम मंजूर करण्यात आले आहे. उर्वरीत ३.९०० किमी क्षतिग्रस्त लांबीच्या दुरूस्तीचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येईल. सद्य:स्थितीत रस्त्यावरून वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथील प्रशासकीय कार्यालयातील निर्लेखित झालेल्या वाहनांबाबत**

**(१३) ५६९२९ (२३-०८-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील प्रशासकीय कार्यालयातील अधिका-यांच्या वाहनांची कालमर्यादा संपुष्टात आल्यानंतर निर्लेखित झालेली वाहने भंगारात जमा न करता ती वर्षानुवर्षे कार्यालयातच पडून असल्याचे माहे मे, २०१६ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गाड्या ठेवलेली तीनशे एकर जागाही वापराविना असून आहे तसेच यासोबत नव्या को-या गाड्याही वापराविना पडून असल्याचे निदर्शनास आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व चौकशीनुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०७-२०१७) :** (१) हे खरे नाही. जिल्हाधिकारी कार्यालय आवारात निर्लेखित केलेली ३ वाहने असून सदर वाहने लिलाव प्रक्रियेद्वारे विक्री करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवाराची जमीन ५ हेक्टर ५६ आर इतकी आहे. या आवारात नव्या को-या गाड्या वापराविना पडून नाहीत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम विभागाने सन २०१० ते २०१५ या कालावधीत मंत्र्याच्या निवासस्थानांवर ५२ कोटी रुपये खर्च केल्याबाबत**

**(१४) ५७९८४ (२४-०८-२०१६). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशाच्या नियंत्रक व महालेखापालांनी (कॅग) प्रसिध्द केलेल्या अहवालात सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सन २०१० ते २०१५ या ५ वर्षाच्या कालावधीत मंत्र्यांच्या निवासस्थानावर ५२ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून नियंत्रक व महालेखापरिक्षकांनी यावर कडक ताशेरे ओढले असल्याचे माहे मार्च-एप्रिल, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंजुर झालेली कामे रद्द करणे, मंजुरी नसलेल्या कामांवर खर्च करणे इ. बेकायदेशीर मार्गाचा अवलंब केला असून ही सर्व निवासस्थाने नव्याने बांधकाम करण्यासाठी ५२ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कॅगने दाखल केलेल्या निष्कर्षानुसार झालेल्या गैरव्यवहाराचा तपास करण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) सदर तपासात दोषी आढळलेल्यांविरोधात शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येणार आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०७-२०१७) :**(१) महालेखापाल यांनी अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे.
(२) मंजुर झालेली कामे रद्द करणे, मंजुरी नसलेल्या कामांवर खर्च करणे इ. बाबत अधीक्षक अभियंता, सा. बां. मंडळ, मुंबई यांचे स्तरावर तपासणी प्रगतीत आहे.
(३) नाही, मंत्र्यांच्या निवासस्थानांकरीता करण्यात आलेला खर्च हा आवश्यक बाबींवर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील पिंपळफाटा ते रेणापूर रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(१५) ५८४८७ (२९-०८-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील पिंपळफाटा ते रेणापूर गावात जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली असून गेल्या दोन महिन्यात २५ पेक्षा अधिक अपघात झाले असल्याचे दिनांक ३१ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले,हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०७-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.
तथापि, प्रश्नाधीन रस्त्याची दुरूस्ती ऑक्टोबर २०१६ मध्ये करण्यात आली आहे. पोलीस अहवालानुसार रस्त्यावर अपघात झाल्याची कोणतीही नोंद नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सिरसो (ता.मुर्तिजापूर) येथील ई-क्लास जमीन गोरक्षणासाठी मिळण्याबाबत**

**(१६) ६१९०३ (१९-०८-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिरसो (ता.मुर्तिजापूर) येथील ई-क्लास जमीन गोरक्षणासाठी मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (मुर्तिजापूर) यांनी दिनांक १६ डिसेंबर २०१५ रोजी मा. महसूल मंत्री याना निवेदन देऊन विनंती केली आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, याप्रकरणी शासनान चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उक्त निवेदनानुसार सदरहू ई-क्लास जमीन गोरक्षणासाठी मिळण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०७-२०१७) :**(१), (२), (३) व (४) या प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १६ डिसेंबर २०१५ रोजी मा. महसूल मंत्री यांना निवेदन देऊन विनंती केली होती. सदर निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आली असून महसूल व वन विभाग, शासन निर्णय दि. १२/०७/२०११ नुसार कोणतीही गायरान/गुरचरण अथवा गावक-यांच्या सार्वजनिक वापरातील जमीन कोणत्याही खाजगी संस्था, व्यक्ती, संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजूर करता येणार नाही. वरील वस्तुस्थिती लोकप्रतिनिधी यांना दि. २९/०५/२०१७ च्या पत्रान्वये अवगत केली आहे.

---

**रेवस-आवरे पोर्ट (रिलायन्स) या खाजगी प्रकल्पासाठी संपादीत केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी परत करण्याबाबत**

**(१७) ६२४४७ (१९-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील ५ हजार ९७४ करोड रुपयांची गुंतवणूक असलेला रेवस-आवरे पोर्ट (रिलायन्स) हा खाजगी प्रकल्प बंद झाला असल्याने शेतक-यांच्या जमिनी परत करण्याचे आदेश कोकण उपायुक्तांनी माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने उपाआयुक्तांच्या आदेशानुसार शेतकऱ्यांकडून रक्कम परत घेऊन जमिन परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) तथापि, याबाबत शासनास प्राप्त झालेली तक्रारी चौकशीसाठी विभागीय आयुक्त, कोकण यांचेकडे पाठविण्यात आले असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, अलिबाग यांचेकडे चौकशी सुरु आहे.

---

**मौजे काजिर्डा (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) येथे अतिक्रमण करुन रस्ता बंद केल्याबाबत**

**(१८) ६२६६८ (१९-०८-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे काजिर्डा (ता.राजापुर, जि.रत्नागिरी) येथील नदीकिनारी लागून असलेल्या व शासनाच्या अखत्यारितीतील जागेमधून जाणाऱ्या व गावातील चार वस्त्यांना जोडणाऱ्या

रस्त्यावर श्री.दत्ता पांडू आर्डे यांनी अतिक्रमण करुन सदर रस्ता आपल्या जमिनीला जोडून घेतल्याने आजूबाजूच्या चार वस्तीतील सुमारे ५०० लोकांच्या येण्या-जाण्याच्या मार्ग पूर्ण पणे बंद केला असतानाही ग्रामपंचायतीने कोणतीही कार्यवाही केली नसल्यामुळे दलित वस्तीत राहणाऱ्या ग्रामस्थांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने दलित वस्तीमध्ये राहण्याऱ्या व इतर ग्रामस्थांना पूर्वीप्रमाणे सदर जागेतून येण्या जाण्याचा बंद केलेला रस्ता मोकळा करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०७-२०१७) :**(१), (२,) (३) व (४) मौजे काजिर्डा ता.राजापूर येथील नदी किनारी लागून असलेल्या शासनाच्या अखत्यारीतील जोड रस्त्या लगतची स.नं.२०/१३ व २/९८ ही जमीन श्री.दत्ता पांडू आर्डे यांचे नांवे आहे. स.नं २०/१३ लगत असलेल्या सरकारी नदीपात्रातील सुमारे ३९ चौ.मी क्षेत्रात श्री आर्डे यांनी नागली पीक घेऊन अतिक्रमण केलेले आहे. ग्रामपंचायत मौजे काजिर्डा यांचे मागणीनुसार नदीवर पुल बांधण्याचे प्रस्तावित असून श्री.आर्डे यांचा त्यांचे जमिनीतून रस्ता पुल काढण्याकरीता विरोध आहे. मात्र बौध्दवाडी व राणेवाडी या वस्त्यांना जाणारा ग्रामस्थांचा रस्ता पूर्णपणे बंद केलेला नाही. रस्ता पुल आपल्या जमिनीतून काढण्याच्या विरुध्द श्री.दत्ता पांडु आर्डे यांनी जिल्हा न्यायालयात संकिर्ण सिव्हिल अपील दाखल केले आहे. सदर दाव्याप्रकरणी न्यायालयाच्या दिनांक २८.१०.२०१५ च्या आदेशानुसार अंतिम आदेश होईपर्यंत श्री.आर्डे यांच्या वहिवाटीस बाधा येईल अशी कार्यवाही करण्यास तसेच पूर्ण बांधकाम करण्यास मनाई केली आहे. अंतिम आदेशानंतर अतिक्रमणाबाबत तहसिलदार, राजापूर यांचे स्तरावर कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**मौजा खडकी, पारडी, मांगलहिरा व जांभळघाट (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथील सर्वे नं. १६, आराजी १३२ हे.आर या जागेत अवैध पट्टे देण्यात आल्याबाबत**

**(१९) ६३६७५ (१९-०८-२०१६). ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजा खडकी, पारडी, मांगलहिरा व जांभळघाट (ता.कोरपना, जि.चंद्रपूर) येथील सर्वे नं. १६, आराजी १३२ हे.आर या शासकीय जमिनीत तलाठ्याच्या संगनमताने बनावट पट्टे देण्यात आल्याचे माहे मे, २०१६ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त तालुक्यातील मौजा-परसोडा, कोठाडा, मेहंदी, येथील सर्वे नं.३२, १३४, १५१ या शासकीय जमिनीत सुध्दा नियमबाह्य पट्टे वाटप करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शासकीय जमिनीचे बोगस पटटे व सातबारा दिल्याप्रकरणी दोषी असणाऱ्यां तलाठी व इतर अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०७-२०१७) :**(१), (२), (३) व (४) कोपरना तालुक्यातील मौजा खडकी, पारडी, मांगलहिरा, जांभुळघाट, परसोडा, कोठोडा, मेहंदी, इत्यादी गावांत बोगस ७/१२ वाटप केल्याची बाब दप्तर तपासणी निरीक्षणाअंती निदर्शनास आलेली आहे. सदर प्रकरणी उपविभागीय अधिकारी, राजुरा यांच्याकडून चौकशी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### खेड (जि.रत्नागिरी) आगारातून वडगाव, जैतापूर, शेरवली, टेटवली ते बिजघर येथे जाणाऱ्या बस फेऱ्या निकृष्ट रस्त्यामुळे बंद असल्याबाबत

**(२०) ६४४७२ (२४-०८-२०१६). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.रत्नागिरी) आगारातून वडगाव, जैतापूर, शेरवली, टेटवली ते बिजघर या मार्गावरील २३ बस फेऱ्या निकृष्ट रस्त्यामुळे बंद ठेवाव्या लागणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांमुळे या बस फेऱ्या बंद कराव्या लागतात तरी शासन याची चौकशी करणार आहे,
(३) अशा प्रकारचा निकृष्ट दर्जाचे रस्ते बांधणाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार आहे तसेच प्रवाशांना होणाऱ्या या त्रासाला कोण जबाबदार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०७-२०१७) :**(१) नाही.

प्रश्नांकित भागातील सा.बां.विभागाच्या अखत्यारीतील ४ रस्त्यांची लांबी ८२.०२० कि.मी. व जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्या अखत्यारीतील ५ रस्त्यांची ३३ कि.मी. लांबी आहे. या रस्त्यांवरुन एस. टी. वाहतूक बारमाही चालू आहे.

या रस्त्याच्या लांबीपैकी काही भाग क्षतिग्रस्त झाले आहेत. या भागातील दुरुस्तीची कामे करुन रस्ते सुस्थितीत ठेवण्यात येत आहेत.

या रस्त्यांच्या काही लांबीतील सुधारणा/मजबूतीकरण डांबरीकरणाची कामे करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी, निधि, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नविन खोपटा (ता.उरण, जि.रायगड) पूलाच्या मार्गात येणाऱ्या एसईझेड च्या भिंती हटविणेबाबत**

**(२१) ६५११६ (१६-१२-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नविन खोपटा (ता.उरण, जि.रायगड) पूलाच्या मार्गात येणाऱ्या एसईझेड च्या भिंती हटविणेबाबत वारंवार संबधित अधिकाऱ्यांना निवेदन देऊनही कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरची भिंत हटविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०७-२०१७) :**(१) नाही.

प्रश्नात नमूद भिंती खोपटा पूलाच्या जोडरस्त्याच्या मार्गात येत नाहीत. त्यामुळे त्या हटवण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच याबाबत कोणतेही निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांना प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शेतीच्या सातबाऱ्यावर पुरुषांबरोबर महिलांचेही नाव लावण्याबाबत**

**(२२) ६५७३७ (१६-१२-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतीच्या सातबारा उता-यावर पुरुष शेतक-यासोबत महिलांचेही नाव लावणबाबतचा प्रस्ताव महसूल विभागाने तयार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रस्ताव मंजुरीसाठी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दिनांक ७ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास पाठविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१७) :**(१) एखाद्या शेतकरी व्यक्तीने धारण केलेल्या जमिनीच्या गाव नमुना नं.७/१२ च्या उता-यात आपल्या कायदेशीर पत्नीच्या नावाची स्वत:बरोबर सहहिस्सेदार म्हणून नोंद घ्यावी, अशी स्वेछेने विनंती केल्यास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतूदींच्या अधीन राहून फेरफार नोंदी करण्याच्या सूचना यापूर्वीच शासन परिपत्रक क्र.एस-१४/२१६१८१६/प्र.क्र.४५८/ल-६, दि.१५.०९.१९९२ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्रीगोंदे (जि.अहमदनगर) व शिरुर (जि.पुणे) तालुक्यांच्या हद्दीवरील शासकीय जमिनीचा झालेला गैरव्यवहार

**(२३) ६६७८२ (१६-१२-२०१६). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीगोंदे (जि.अहमदनगर) व शिरुर (जि.पुणे) तालुक्यांच्या हद्दीवर घोड धरणाच्या पाणलोट क्षेत्रासाठी संपादित केलेल्या जमिनी परस्पर शेतकऱ्यांच्या नावावर झाल्याचा गैरप्रकार निदर्शनास आल्याने एका वर्षानंतर तीन तलाठ्यांना निलंबित करुन १४ मंडलाधिकाऱ्यांवर ठपका ठेवण्यात आला असून त्यांच्यावरील कारवाईचा प्रस्ताव जिल्हाधिकारी यांचेकडून प्रलंबित असल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेकडो हेक्टर क्षेत्राची परस्पर जमिनीची विल्हेवाट लावताना महसूल कर्मचाऱ्यांनी ७/१२ उताऱ्यावर खाडाखोड करुन फेरफार उतारे नष्ट करुन सरकारी जमिनी शेतकऱ्यांच्या नांवे करुन मोठा गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित प्रकरणात २३ जणांविरुध्द ठपका ठेवून त्यांच्या चौकशीचा अहवाल सादर केल्यानंतर याबाबत फेरचौकशी समिती नेमूनही तोच अहवाल पुन्हा कायम ठेवण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाची जमीन परस्पर नावांवर करणारे शेतकरी व संबंधित अधिकारी-कर्मचारी यांचे विरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०७-२०१७)** :(१) घोड धरणासाठी संपादित केलेल्या जमिनींच्या कागदपत्रांमध्ये मूळ कब्जेदाराचे नाव कायम राहिल्यामुळे सदर जमिनींचे हस्तांतरण परस्पर शेतकऱ्यांच्या नावावर झाल्याचा गैरप्रकार श्रीगोंदा (जि. अहमदनगर) तालुक्यातील काही गांवामध्ये झाल्याचे निदर्शनास आले असून शिरुर (जि.पुणे) या कार्यालयाच्या कार्यकक्षेत असा गैरप्रकार झाल्याचे आढळून आलेले नाही. सदर प्रकरणी दोषी आढळलेल्या ३ तलाठयांना निलंबित करण्यात आले असून उर्वरित जबाबदार तलाठी तसेच मंडळ अधिकारी यांच्याविरुध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) सदर जमिनीच्या हस्तांतरणाची बाब निदर्शनास आल्यानंतर समन्वयक भूसंपादन, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्या दिनांक ३०.७.२०१५ च्या प्राथमिक चौकशी अहवालानुसार सन १९५५ प्रमाणे संपादित जमिनीबाबत तत्कालीन तलाठी यांनी संपादित क्षेत्राची नोंद करताना कब्जेदार सदरी मूळ क्षेत्रातून संपादित क्षेत्र वजा करुन कब्जेदार सदरील संपादित क्षेत्र तसेच मूळ कब्जेदाराचे शिल्लक क्षेत्र अशा प्रकारच्या नोंदी गा.न.नं.७/१२ वर न घेण्यात आल्यामुळे नंतरच्या कालावधीत वारस नोंद, सविभाजन, गहाण, खरेदी विक्री अशा पध्दतीने हस्तांतरण झाल्याचे निदर्शनास आले.

तद्नंतर उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा-पारनेर भाग यांच्या दिनांक १८.७.२०१६ च्या विस्तृत चौकशी अहवालानुसार तत्कालीन १४ मंडळ अधिकारी व तत्कालीन ८ तलाठी दोषी असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) व (५) प्रस्तुत प्रकरणी जबाबदार कर्मचाऱ्यांविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना या विभागामार्फत जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना वेळोवेळी देण्यात आलेल्या आहेत.

प्रकरणात दोषी असलेल्या ३ तलाठी व १४ मंडळ अधिकाऱ्यांविरुद विभागीय चौकशी सुरु करण्याची कार्यवाही तसेच प्रस्तुत घोड प्रकल्पाच्या संपादित क्षेत्राच्या अभिलेख दुरुस्तीची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, श्रीगोंदा-पारनेर भाग यांच्यास्तरावर सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे शेगाव (जि.बुलडाणा) भाग-२ येथील शासकीय जमिन श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव यांना कायमस्वरूपी देण्याबाबत**

**(२४) ६७७७५ (१६-१२-२०१६). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शेगाव, (जि.बुलडाणा) भाग-२ येथील सर्वे नं. २२५ व २४७ मधील तलावाच्या सौंदर्यीकरणासाठी श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव यांना दिलेली शासकीय जमिन कायमस्वरूपी देण्याबाबतचा प्रस्ताव माहे फेब्रुवारी, २०१६ पासून शासनाकडे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संस्थेस जमिन देण्याबाबतच्या प्रलंबित प्रस्तावावर अंतिम निर्णय घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०६-०७-२०१७) :**(१), (२), (३) व (४) श्री. गजानन महाराज संस्थान शेगांव, जि. बुलढाणा या संस्थेने मौजे शेगाव भाग-२, ता. शेगाव येथील सर्व्हे क्र. २२५ व २४७ मधील जमिनीचा भाडेपट्टा वाढवून देण्याची मागणी केली होती. त्यानुसार शासनाने दि. १९/०७/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये आनंदसागर या प्रकल्पासाठी उक्त १०१.३२ हे. आर जमीन शासनाच्या प्रचलित धोरणानुसार ३० वर्षाकरीता रुपये १/- या नाममात्र वार्षिक भुईभाडेपट्याने सदर संस्थेस मंजुर केली आहे.

---

**नागपूर शहरामधील अनेक महत्वाच्या रस्त्यांवर खड्डे पडल्याबाबत**

**(२५) ६९३७६ (१६-१२-२०१६). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरामधील अनेक महत्वाच्या रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहने चालविणे धोक्याचे झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्यावर वाहन चालविणारे वाहनचालक खड्डे चुकविण्याचा प्रयत्न करताना वाहनांची एकमेकांना टक्कर होऊन वाहन चालक गंभीर जखमी होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या रस्त्यावरील खड्डे बुजविण्याची जबाबदारी नागपूर महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास, राष्ट्रीय महामार्ग प्राधीकरण व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची असतांना सुध्दा अद्यापपर्यंत खडडे बुजविण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शहरातील अतिशय महत्वाच्या रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यास विलंब लावणाऱ्या संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येणा-या रस्त्यावरील खड्डे दुरूस्तीची कामे डांबर मिश्रीत खडीने दि. ३१/१२/२०१६ पर्यंत पूर्ण करण्यात आले आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माळशिरस (जि.सोलापुर) तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(२६) ७०४३७ (१६-१२-२०१६). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माळशिरस (जि.सोलापुर) तालुक्यातील रस्त्यांची व गट नं २५/४ श्रीपुर ते नेवरे या प्रमुख जिल्हा मार्गाची दुरवस्था झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या मार्गावरील रस्त्याच्या दुरवस्थेमुळे एस.टी.वाहतुक व खाजगी वाहतुकही बंद झाली असल्यामुळे मिरे कोढारपट्टा व इतर गावामधील नागरीकांची गैरसोय होत असल्याने मार्गाची दुरुस्ती करण्यासाठी लोकप्रतिनिधींनी दिनांक २२ सप्टेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार सदरच्या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०७-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) माळशिरस तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित ८०४.८० कि.मी. लांबीचे राज्यमार्ग व प्र.जि.मा. दर्जाचे रस्ते व जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या अखत्यारित १४४३.१० कि.मी.लांबीचे इ.जि.मा. व ग्रा.मा.दर्जाचे रस्ते दुरुस्ती व देखभालीसाठी आहेत. या रस्त्यांच्या लांबीपैकी काही लांबीत रस्ते क्षतिग्रस्त झाले होते. या रस्त्यांची दुरुस्ती करुन रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत.

श्रीपूर ते नेवरे या प्र.जि.मा. दर्जाच्या रस्त्यावरुन मोठया प्रमाणात वाळू वाहून नेणारी जडवाहने जात असल्याने रस्ता काही लांबीत मोठया प्रमाणात क्षतिग्रस्त झाला आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

तालुक्यातील रस्त्याच्या काही लांबीत मजबूतीकरण व डांबरीकरण व अन्य सुधारणांची कामे करणे आवश्यक आहे. ही कामे मंजूरी निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

(३) विषयांकित रस्त्याची पाहणी केली असता कि.मी. ०/०० ते ५/०० हा रस्ता डांबरी पृष्ठभागाचा असून सुस्थितीत आहे व कि.मी. ५/०० ते १४/०० (श्रीपूर ते नेवरे) या लांबीमध्ये मोठया प्रमाणात वाळू वाहतुक झाल्याने रस्ता क्षतिग्रस्त झालेला होता.

सदयस्थितीतमध्ये डांबरी पृष्ठभागावरील खड्डे डांबराने भरुन व काही भागामध्ये खड्डे खडी मुरमाने भरुन रस्ता वाहतुकीस सुस्थितीत ठेवण्यात आलेला आहे. सदयस्थितीमध्ये रस्त्यावरुन वाहतुक सुरु आहे.

(४) डांबरी पृष्ठभागावरील खड्डे डांबराने भरुन मोठया प्रमाणात क्षतिग्रस्त झालेल्या भागातील खड्डे खडी व मुरमाने भरुन रस्ता वाहतुकीसाठी सुरळीत ठेवलेला आहे. रस्त्याच्या कि.मी ८/६५० ते १४/०० या ५.३५० कि.मी. लांबीत रस्त्याचे मजबूतीकरण व डांबरीकरणाचे काम मंजूर असून निविदा स्तरावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ओझर ग्रामपंचायत अंर्तगत ५५ ओपन स्पेसला जागा मालकाचे नांव लावल्याबाबत**

**(२७) ७०६७८ (१६-१२-२०१६). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाचे आदेश जमिन-१/२००६/प्रक १२ /ज-१ दिनांक. २५ मे २००५ च्या आदेशा प्रमाणे महाराष्ट्रात सर्वत्र ओपन स्पेसला सरकार/ महापालिका/ नगरपालिका/ ग्रामपंचायतीचे नांव लागत असतांना महसुल अधिकारी व ग्रामसेवक यांनी संगनमत करुन आर. टी. एस. अपीलाव्दारे ओझर ग्रामपंचायत अंर्तगत ५५ ओपन स्पेसला जागा मालकांचे नांव लावले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास जागा मालकांचे नांव लावुन ओपन स्पेसच्या जागांचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून संपादनासाठी मोठया रककमेची अपहार करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास मोठया प्रमाणावर ओपन स्पेसला जागा मालकाचे नांव लावल्यामुळे विकास कामात अडथळे निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास उक्त प्रकरणी शासनाच्या धोरणा प्रमाणे ओपन स्पेसला सरकार/महापालिका/ नगरपालिका/ग्रामपंचायतीचे नांव लावण्यासाठी तसेच शासनाच्या रकमेचा अपहार करणाऱ्यां संबंधित अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०७-२०१७)** :(१) ओझर ता.निफाड येथील मंजुर अभिन्यासातील ओपनस्पेस (खुली) जागा व रस्ते करीता स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामपंचायत ओझर यांचे नांव दाखल करण्याकरीता फेरफार नोद नं. १४८६६ दिनांक २८/०६/२००८ रोजी करण्यात आली. सदर फेरफार नुसार मंजुर अभिन्यासातील खुली जागा व रस्ते करीता ग्रामपंचायत ओझर यांचे नांव दाखल केलेले आहे. श्री. नामदेव कारभारी कदम व इतर यांनी सदर फेरफार नोंद नं १४८६६ विरुद्ध उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड यांचेकडे अपिल दाखल केले होते. उपविभागीय अधिकारी, निफाड भाग, निफाड यांचेकडील दिनांक ०८/११/२०१० रोजीच्या आदेशान्वये फेरफार नोंद नं १४८६६ रद्द करणेबाबत आदेश पारीत केलेले आहेत. सदर आदेशाविरुद्ध ग्रामपंचायत, ओझर यांनी अपर जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडे आरटीएस/अपील १८२/२०१० दाखल केले असता अपर जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडील आदेश दिनांक १७/०९/२०११ अन्वये उपविभागीय अधिकारी निफाड यांचेकडील दि.०८/११/२०१० रोजीचा आदेश कायम केलेला आहे. अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या निर्णयाविरुद्ध ग्रामपंचायत, ओझर यांनी अपर विभागीय आयुक्त,नाशिक यांच्याकडे अपिल केले असुन त्यानुसार अपर विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडे अपिलावर सुनावणीचे कामकाज सुरु आहे.ओपनस्पेस व रस्त्याकरीता दिनांक ८/११/२०१० रोजीच्या उपविभागीय अधिकारी निफाड यांच्या अर्धन्यायिक आदेशानुसार मुळ भोगवटदाराचे नाव दाखल आहे.
(२) अपर जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दिलेल्या दिनांक १७/०९/२०११ चे आदेशानुसार ग.नं.१५८+१५९ चे कब्जेदार श्री.नामदेव कारभारी कदम व इतर ५ यांनी संपादन क्षेत्राच्या मोबदल्याची मागणी केलेली होती. याबाबत सहा.संचालक, नगर रचना नाशिक यांचेकडील अभिप्रायाप्रमाणे रुंदीकरणाखालील क्षेत्र १२ मीटर समांतर सेवा रस्त्याखालील संपादित क्षेत्रास नियमानुसार मोबदला देय असल्यामुळे ग.नं. १५८+१५९ खालील संपादनात येणारे २१५० चौ.मी. क्षेत्रास कब्जेदार श्री. नामदेव कारभारी कदम व इतर ४ यांची नावे असल्याने त्यांना संपादन क्षेत्रावरील बांधकाम व फळझाडे रक्कम अदा करुन त्यांचेकडुन बांधकामाचा व फळझाडांचा कब्जा घेतला तसेच ३६२ चौ.मी. संपादन क्षेत्राचा मोबदला अदा करुन त्यांचे कडुन उक्त संपादन क्षेत्राचा कब्जा घेण्यात आला आहे.सहायक संचालक, नगररचना, नाशिक यांचेकडील दिनांक ११/०१/२०१३ चा अभिप्रायानुसार उर्वरीत संपादन क्षेत्र १७८८ चौ.मी. क्षेत्राचा मोबदला अदा करुन त्यांचेकडुन उक्त संपादन क्षेत्राचा देखिल कब्जा घेतला आहे. त्यामुळे संपादनासाठी मोठया रक्कमेचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद जिल्हयातील पानवडोद ते गोळेगाव या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(२८) ७१००६ (१६-१२-२०१६). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद जिल्हयात प्रशासकीय यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे पानवडोद ते गोळेगाव या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावर मोठेमोठे खड्डे पडले असल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणे धोक्याचे झाले असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही.

रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावर पडलेले खड्डे डांबरमिश्रीत खडीने भरण्यात आले आहेत. सद्य:स्थितीत रस्त्यावरून वाहतूक सुरळीतपणे सुरू आहे.

(२) प्रश्नांकित रस्त्याच्या किमी ३४६/५०० ते ३५७/५००, किमी ११२/५०० ते १२३/५०० या लांबीतील सुधारणेच्या कामाची निविदा प्रक्रीया इ. बाबी पूर्ण करून लवकरच काम सुरू करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मनमाड (जि.नाशिक) तालुक्याची निर्मिती करुन कायमस्वरुपी अप्पर तहसीलदारांची नेमणूक करण्याबाबत

**(२९) ७१२२३ (१६-१२-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड (जि.नाशिक) शहरातील नागरिकांनी व मनमाड बचाव कृती समितीने नवीन मनमाड तालुक्याच्या निर्मिती व कायमस्वरूपी अप्पर तहसिलदारांची नेमणूक या मागण्यांसाठी दिनांक १२ ते २० ऑगस्ट, २०१६ रोजी पर्यत उपोषण करुन मनमाड शहर बंद केले होते हे आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मनमाड नवीन तालुका निर्मितीसाठी व येथे कायमस्वरूपी अप्पर तहसीलदारांची नेमणुक करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (११-०७-२०१७)** :(१) व (२) होय.

(३) व (४) तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून त्यानुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनस्तरावर सुरु आहे. धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर प्रकरणपरत्वे निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सद्य:स्थितीत नवीन पद निर्मितीस शासनाने बंधन घातलेले आहे. त्यानुषंगाने नवीन अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याकरीता आवश्यक असणारी पदे ही शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आकृतीबंधाच्या आढाव्याअंती अतिरिक्त ठरणाऱ्या पदांचे समायोजन करुन उपलब्ध करुन देणे शक्य आहे का याबाबत छाननी झाल्यानंतर निर्णय घेण्याचे योजिले आहे.

---

## कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) मंडळातील १४ गावांपैकी केवळ ३ गावांत तलाठी कार्यरत असल्याबाबत

**(३०) ७३८६२ (१२-०४-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) हे ५० हजार लोकसंखेचे मोठे महसुली गाव असून या गावात २ तलाठी आवश्यक असताना येथील कार्यरत तलाठ्यावर नऊ गावांचा अतिरिक्त पदभार दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गावातील इंटरनेट सेवा तसेच इतर यंत्रणा बंद अवस्थेत असल्याने व त्यातच तलाठी उपलब्ध नसल्याने ग्रामस्थांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोडोली या गावासह अन्य गावातील तलाठ्याकडेही अतिरिक्त पदभार दिलेला असल्याने गावात कोतवालामार्फत कामकाज चालवावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०७-२०१७)** :(१), (२), (३) व (४) कोडोली (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) या साझासाठी एक तलाठी पद मंजूर असून कोडोली तलाठी यांचेकडे सद्य:स्थितीत मोहरे साझातील काखे या एकाच गावाचा अतिरिक्त कार्यभार देणेत आलेला आहे.

कोडोली येथे ४ एमबीपीएस ब्रॉडबँड इंटरनेट सेवा उपलब्ध करुन देणेत आलेली असून इंटरनेट सेवेमध्ये काही तांत्रिक अडचण आल्यास तलाठी यांचे स्तरावर डाटा कार्ड वापरणेची सुविधा उपलब्ध करुन त्यांचे मागणीनुसार व वापरानुसार संबंधितांना बिल अदा करणेची सुविधा देणेत आलेली आहे.

कोडोली साझाव्यतिरिक्त आरळे व जाखले साझातील तलाठी अनुक्रमे वैद्यकीय रजेवर असल्याने व पदोन्नती झाल्याने सदरचे पद रिक्त आहे. तसेच सावर्डे तर्फ सातवे येथील तलाठयाच्या सेवा उपविभागीय अधिकारी कार्यालय, पन्हाळा येथे वर्ग केल्या असल्याने सदर साझाचा अतिरिक्त कार्यभार इतर तलाठी यांना देणेत आलेला आहे. तलाठी नसल्याने कोणत्याही गावात कोतवालामार्फत कामकाज चालवावे लागत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील शेती महामंडळाच्या क्षेत्रात बेकायदेशीरपणे पिके घेतल्याबाबत**

**(३१) ७४४२७ (१२-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्रीगोंदे (जि.अहमदनगर) तालुक्यातील शेती महामंडळाच्या क्षेत्रात बेकायदेशीरपणे पिके घेण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले असून बेलवंडीच्या शेती महामंडळातील झाडांची वृक्षतोड करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०७-२०१७) :**(१) महाराष्ट्र शेती महामंडळाच्या बेलवंडी मळयातील क्षेत्रावर संयुक्त शेती करारधारकांव्यतिरिक्त कोणीही बेकायदेशीरपणे पिके घेत नाहीत. तसेच गेल्या ३ वर्षापासून पाऊस नसल्याने वाळलेली व वठलेली आंब्याची व पेरुची झाडे विहित परवानगी घेऊन तोडण्यात आलेली आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शासकिय जागेवर राहत असलेल्या कुटुंबाना मालकी हक्काचे उतारे देण्याबाबत**

**(३२) ७६६८६ (१२-०४-२०१७). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई, नेवासा (जि.अहमदनगर) तसेच राज्यात शासकिय जागेवर राहत असलेल्या कुटुंबाना मालकी हक्काचे उतारे देण्याचे आदेश सन २०१५ मध्ये मा.उच्च न्यायालयाने देऊनसुद्धा या आदेशाची अंमलबजावणी महसूल विभागाने न केल्याने सन २०२२ पर्यत सर्वाना घरे देण्याबाबतची प्रधानमंत्री आवास योजना अडचणीत आली असल्याचे माहे जानेवारी, २०१७

मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेकरिता मालकी हक्काचा उतारा गरजेचा असल्याने व बहुंतांशी कुटुंबाजवळ मालकी हक्काचे उतारे नसल्याने ते या योजनेस पात्र ठरत नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मालकी हक्काचे उतारे देण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश देऊनसुद्धा सदरचे उतारे देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त नागरिकांना मालकी हक्काचे उतारे देण्याबाबत तसेच उतारे देण्यास विलंब लावणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०७-२०१७) :**(१), (२), (३), (४) व (५) "प्रधानमंत्री आवास योजना-सर्वासाठी घरे-२०२२" या योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्पांसाठी म्हाडा, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय व निमशासकीय संस्था या अंमलबजावणी करणा-या यंत्रणांना शासकीय जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत सर्वसमावेशक निर्देश महसूल व वन विभागाच्या दिनांक १९.९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आले आहेत.

शासन निर्णय दिनांक ४.४.२००२ अन्वये शासकीय जमिनीवरील दि.१.१.१९९५ रोजी अस्तित्वात असलेल्या झोपडपटटींची अतिक्रमणे नियमित करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

तथापी मा.सर्वोच्च न्यायालय, सिव्हील अपिल क्र.११३२/२०११ एसएलपी (सी) ३१०९/२०११ (जगपाल सिंग व इतर विरुध्द पंजाब राज्य व इतर) या याचिकेत मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२८.१.२०११ रोजी दिलेल्या निदेशानुसार शासनाने दि.१२.७.२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक वापरातील जमिनी/गायरान जमिनी इतर प्रयोजनासाठी वापरण्यावर निर्बंध घालण्याबाबत व अशा जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत आदेश पारीत केले आहेत. त्यामुळे गायरान जमिनीवरील निवासी अतिक्रमणे शासन निर्णय दिनांक ४.४.२००२ प्रमाणे नियमाकूल करता येत नाहीत.

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त निर्णयाच्या व तदनुषंगिक शासन निर्णय दिनांक १२.७.२०११ च्या अनुषंगाने उचित कार्यवाही करण्याचे निर्देश जनहित याचिका क्र.३९/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि.२३.६.२०१५ रोजी दिले आहेत.

---

**राज्य सरकारच्या 'शहर टॅक्सी योजना-२०१६' बाबत**

**(३३) ७७१६१ (१३-०४-२०१७). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.किशोर पाटील**

**(पाचोरा), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने "शहर टॅक्सी योजना-२०१६" ही योजना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये जाहिर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेचे स्वरुप काय आहे,

(३) सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (१०-०७-२०१७)** :(१) समुच्चयक कंपन्याद्वारे चालविण्यात येणा-या संकेतस्थळ आधारीत टॅक्सी सेवांबाबत सेवेचे विनियमन करण्यासाठी दि.०४.०३.२०१७ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम, २०१७ विहित करण्यात आलेले आहेत.

(२) व (३) सदर नियमांमध्ये अनुज्ञप्ती धारकाचा तपशील, कार्यान्वयनासाठी पायाभूत सुविधा, वाहनांसंबंधी तपशील, सेवा प्रदान करण्यासाठीची व्यवस्था, वाहनचालकाबद्दलचा तपशिल, परवाना प्रदान करणे कालावधी व त्याचे नुतनीकरण, शुल्क, सुरक्षा अनामत, भाडे, अनुज्ञप्ती निलंबन/रद्द करणे, अपील व इतर अनुषंगिक तरतुदी विहीत करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्ह्यातील नांदगांव तालुक्याचे विभाजन करून मनमाड तालुका निर्माण करण्याबाबत

**(३४) ७७८२४ (१२-०४-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील नांदगांव तालुक्याचे विभाजन करून नवीन मनमाड तालुका करावा यासाठी व अन्य विविध मागण्यांसाठी दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ ते २० ऑगस्ट, २०१६ पर्यंत मनमाड बचाव समिती व शहरातील नागरिकांनी आंदोलन व आमरण उपोषण केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई तालुक्याची सन २०११ सालच्या जनगणनेनुसार लोकवस्ती १६ लाखांपेक्षा अधिक असल्याने तहसिलदार, वसई यांनी वसई तालुक्याचे विभाजन करुन स्वतंत्र विरार तालुक्याची निर्मीती करण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ०३ सप्टेंबर, २०१५ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे सादर करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग १ व २ च्या अनुषंगाने मनमाड व विरार तालुका निर्माण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०७-२०१७)** :(१) होय.
(२) नाही.
(३) तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून त्यानुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनस्तरावर सुरु आहे. धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर प्रकरणपरत्वे निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विभागात ओला व उबेर या खाजगी टॅक्सी सेवेसाठी नियम व अटी करण्याबाबत**

**(३५) ७८५४२ (१३-०४-२०१७). श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ओला व उबेर या खाजगी टॅक्सी सेवेसाठी काही नियम व अटी विहित केल्या आहेत काय,
(२) असल्यास, ही वाहतूक सेवा प्रवाशांना सुरक्षित व दिलासा देणारी वाटत असल्याने ती सेवा अधिकृत करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, शासनाने या संदर्भात कोणती कार्यवाही केली आहे वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (२०-०७-२०१७)** :(१), (२) व (३) समुच्चयक कंपन्याद्वारे चालविण्यात येणा-या संकेतस्थळ आधारीत टॅक्सी सेवांबाबत सेवेचे विनियमन करण्यासाठी दि.०४.०३.२०१७ च्या अधिसूचनेन्वये महाराष्ट्र सिटी टॅक्सी नियम, २०१७ विहित करण्यात आलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने पर्ससिनद्वारे होणा-या मासेमारीवर निर्बंध आणल्यामुळे कोकणातील मच्छीमारांचे झालेले नुकसान**

**(३६) ७८५८९ (१३-०४-२०१७). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मत्स्य दुष्काळावर तोडगा म्हणून राज्य शासनाने पर्ससिनद्वारे होणा-या मासेमारीवर निर्बंध आणले असल्याने मागील वर्षाच्या तुलनेत २८,०१२ मेट्रीक टन मस्त्योत्पादनात घट झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे कोकणातील मच्छीमारांना अनेक कोटी रूपयांचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नुकसान पाहता शासन पर्ससिनद्वारे होणा-या मासेमारीवरील निर्बंध उठवणार आहे काय वा यावर कोणती उपाययोजना करणार आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. महादेव जानकर (१९-०७-२०१७) :**(१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण रस्त्यांना निधी मिळण्याबाबत

**(३७) ७८६९४ (१९-०४-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील ग्रामीण रस्त्यांना निधी देण्याची मागणी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे माहे डिसेंबर, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१०-०७-२०१७) :**(१) कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड विधानसभा मतदारसंघातील दोन रस्त्यांच्या दुरुस्तीची मागणी दि.१४.१२.२०१६ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे.
(२) आणि (३) प्रस्तूत प्रकरणी मागणीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.
(i) गडहिंग्लज तालुक्यातील रा.मा.१८८ ते हिटणी खणदाळ, ता.गडहिंग्लज प्रजिमा ला मिळणारा रस्ता–सदर रस्ता इजिमा क्र.१९९ दर्जाचा असून सदर रस्त्याच्या ८७५ मीटर लांबीमध्ये डांबरीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले असून रस्ता सुस्थितीत आहे.
(ii) प्रजिमा क्र.६४ घुलेवाडी ते मलतवाडी ता.चंदगड रस्ता-- सदर रस्ता प्रजिमा क्र. ६४ दर्जाचा असून सदर रस्त्याच्या ३५० मीटर लांबीमध्ये दुरुस्तीचे काम सद्य:स्थितीत पूर्ण करण्यात आले असून रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

---

### राज्यातील गायरान जमिनीवर अतिक्रमणे होत असल्याबाबत

**(३८) ७८७५८ (१२-०४-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ च्या कलम २२ नुसार विशेष कारणांसाठी बिनभोगवटयाच्या जमिनी राखीव ठेवण्याच्या तरतुदीनुसार गावातील भोगवटयात नसलेल्या जमिनींना गायरान जमीन म्हणुन संबोधले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या गायरान जमिनीवर अतिक्रमणे होत असल्याचे तसेच संबंधित ग्रामपंचायतीकडून तिचा अनधिकृतरित्या व्यापारी स्वरुपाचा वापर केला जात असल्याचे दिनांक २८ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार राज्यशासनाने सर्व यंत्रणांना कोणत्याही खाजगी व्यक्ती अथवा संस्थेस गायरान जमिनी किंवा सार्वजनिक वापरासाठी राखीव असलेल्या जमिनीचे वाटप करु नये असे स्पष्ट आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाच्या उक्त आदेशाची अंमलबजावणी न करणाऱ्यांवर व गायरान जमिनीचा अवैध वापर करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०७-२०१७)** :(१) होय.
(२) काही ठिकाणी अशी बाब निदर्शनास आली आहे.
(३) व (४) गायरान जमिनीच्याबाबतीत गावकऱ्यांच्या सार्वजनिक वापरासाठी ग्रामपंचायतीकडे निहीत केलेल्या जमीनी तसेच गायरान जमीनीवरील अतिक्रमणाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने "जगपाल सिंग व इतर विरुध्द पंजाव राज्य व इतर" या प्रकरणी दिनांक २८.१.२०११ रोजी नोंदविलेले निरीक्षण व दिलेले आदेश यांच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.जमीन-०३/२०११/ प्र.क्र.५३/ज-१,दि. १२.७.२०११ अन्वये गायरान जमीन अथवा सार्वजनिक वापरातील जमीन कोणतीही व्यक्ती/खाजगी संस्था, संघटना यांना कोणत्याही प्रयोजनासाठी मंजूर करण्यात येऊ नये असे आदेश शासनाने निर्गमित केलेले असून गायरान जमीनीच्या वाटपावर निर्बंध घातलेले आहेत. उक्त शासन निर्णयाप्रमाणे प्रकरण परत्वे कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## औरंगाबाद ते जळगाव हा मार्ग चौपदरी करण्याबाबत

**(३९) ७९४८५ (१२-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद ते जळगाव हा मंजूर असलेला ४ पदरी रस्ता शासनाने २ पदरी केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औरंगाबाद जिल्हयातील जगप्रसिध्द वेरूळ व अजिंठा लेणीला भेट देण्यासाठी देशातील व परदेशातील नागरिक येत असतात व त्यांच्यासाठी हा एकमेव मार्ग आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर मार्गावरील रहदारीचे प्रमाण वाढल्याने मोठ्या प्रमाणावर अपघात होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर मार्ग चौपदरी करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०७-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे असल्याचे पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण यांनी कळविले आहे.
(३) व (४) सदरील रस्त्याचे खाजगीकरणांतर्गत चौपदरीकरण करणे प्रस्तावित होते. तथापि औरंगाबाद - फुलंब्री - सिल्लोड - अंजिठा - फर्दापुर - पहूर - जळगांव हा रस्ता दि.०३.०१.२०१७ च्या राजपत्रान्वये राष्ट्रीय महामार्ग ७५३ F म्हणून घोषित झालेला आहे. सदर रस्त्याचे सुधारणेसह कठीण बाजू पट्टया असलेल्या कॉंक्रीट रस्ता बांधकामाचे काम मंजूर झालेले आहे. सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली असून कंत्राटदाराची नेमणूक करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील अनेक गावातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४०) ७९६६१ (१२-०४-२०१७). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील अनेक गावांतील रस्त्यांची दुरवस्था झाली असून अनेक नागरिकांना या खड्डेमय रस्त्यांमुळे प्राणास मुकावे लागले असून अनेकांना आजाराने ग्रासले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सिल्लोड येथील ५० वर्षापूर्वीचा निजामकालीन पूल जीर्ण झाला असल्यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करुन सिल्लोड येथील रस्ते व पूलांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०७-२०१७)** :(१) हे खरे नाही.
सा.बां.विभागाच्या अखत्यारितील रस्त्यांचे डांबरीकरण/नुतनिकरण वेळोवेळी आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धततेनुसार करण्यात येते.
(२) व (३) सिल्लोड तालुक्यामध्ये पुलांबाबत निजामकालीन पूल अशी नोंद/उल्लेख अभिलेख्यांमध्ये आढळून येत नाही. तथापि, सिल्लोड तालुक्यात एकूण १३ जुने पूल आहेत. त्यापैकी कन्नड भराडी सिल्लोड रस्त्यावरील कोसळलेल्या पुलाच्या ठिकाणी नविन पुलाचे

बांधकाम पूर्ण करण्यात आले असून त्यावरील वाहतुक सुरळीत सुरु आहे. ६ पुलांच्या दुरुस्तीच्या कामास मंजूरी दिली असून निविदा प्रक्रिया पूर्ण करुन सदर कामे हाती घेण्यात येत आहेत. उर्वरित ६ पूल सुस्थितीत असून पुलावरून वाहतुक सुरळीत सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विविध वस्ती-वाडा-तांडे यांना महसुली दर्जा देण्याबाबत**

**(४१) ७९७६० (१२-०४-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध महसुली विभागांतर्गत असलेल्या वस्ती-वाडा-तांडे यांना विनाअट महसुली दर्जा द्यावा अशी मागणी संबंधित महसुली विभागाच्या जनप्रतिनिधी, सेवाभावी संघटना यांनी मा.मंत्री (महसूल), मा.राज्यमंत्री (महसूल), संबंधित जिल्हयाचे पालक मंत्री आणि संबंधित विभागाचे विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भातील प्रस्ताव किती जिल्हा प्रशासनाकडून माहे जानेवारी, २०१७ अखेरपर्यंत शासनास प्राप्त झाले आहे व त्यापैकी किती प्रस्तावास तत्वतः मंजुरी देण्यात आली आहे,
(३) असल्यास, उपरोक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहे?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०७-२०१७) :**(१), (२) व (३) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४ पोट-कलम (१) खंड (एक) ते (सहा) यामध्ये महसूल विभाग, जिल्हे, महसूली उप विभाग, तालुके, महसूली गावे या महसुली क्षेत्रांचे रचना करण्याची तरतूद आहे. त्यानुसार ३०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वाडया/ तांडे/ वस्त्या यांना स्वतंत्र महसूली गावांचा दर्जा देण्याबाबतचे अधिकार शासन अधिसूचना क्र. टिएलसी/१०७६/६३९२३/म-६, दिनांक ०१.०७.१९७६ व शासन परिपत्रक क्र. टिएलसी १०८५/ ५७६८-प्रक्र ७२/८५/म-१०, दिनांक १८.०५.१९८५ अन्वये अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हास्तरावर सदर प्रकरणी कार्यवाही करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील हिंबटपाडा गावात जाण्यासाठी रस्ता करण्याबाबत**

**(४२) ८०५३५ (१४-०४-२०१७). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील चास ग्रामपंचायत अंतर्गत हिंबटपाडा या गावात जाण्यासाठी रस्ता नसल्याने ग्रामस्थ महिलांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग, मोखाडा कार्यालया समोर दिनांक १७ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार हिंबटपाडा गावात रस्ता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०७-२०१७)** :(१) व (२) होय.

(३) सदर रस्त्याचे व पुलाचे काम अर्थसंकल्पात मंजूर असून सदर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील सायवन पुलाची झालेली दुरवस्था

**(४३) ८०५५१ (१४-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील दुर्गम भागातील गावांना जोडणारा सायवन ओढ्यावरील पूल जीर्ण झाला आहे तसेच पूलाच्या बाजूचे कठडे देखील तुटल्याने येथील वाहतुकीस धोका निर्माण झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाची शासनाने पाहणी केली आहे काय, पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, त्यानुसार सदर पुलाच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०७-२०१७)** :(१), (२) व (३) नाही.

तथापि पुलाची पॅरपेट वॉल काही ठिकाणी क्षतिग्रस्त झाली आहे. ती दुरुस्ती करण्याचे काम मंजूर करण्यात आले असून निविदा स्तरावर आहे.

पूल वाहतुकीस सुस्थितीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील नरिमन पॉईन्ट येथील समुद्रात उभारण्यात येणा-या शिवस्मारकाबाबत**

**(४४) ८०८४७ (१२-०४-२०१७). श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरिमन पॉईन्ट, मुंबई येथील समुद्रात उभारण्यात येणा-या प्रस्तावित शिवस्मारकाला पर्यावरणवादी व मच्छिमार विरोध करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्माराकासाठी समुद्रात भराव टाकण्यात येणार असल्याने स्मारकनजीकच्या किनारपटटीवरील वाळूची धुप होऊन पाण्याच्या पातळीतही वाढ होण्याची भिती सागरी अभ्यासक व्यक्त करीत असल्यामुळे राजभवन, गिरगाव चौपाटी, नरिमन पॉइन्ट, हाजीअली इत्यादी भागांना त्याचा धोका पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०७-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. या प्रकल्पासाठी नेमण्यात आलेला केंद्र शासनाच्या नामांकित संशोधन संस्थेच्या अहवालानुसार प्रकल्पामुळे अशा प्रकारचा कोणताही धोका निर्माण होण्याची शक्यता नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पळसमंडळ-जावरा मो-खंडाळा (ता.नांदगाव खं.,जि.अमरावती)**
**या रस्त्याच्या भुसंपादनाचा मोबदला देण्याबाबत**

**(४५) ८१६९६ (१२-०४-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पळसमंडळ-जावरा मो-खंडाळा (ता.नांदगाव खं.,जि.अमरावती) या रस्त्याच्या भुसंपादन (भुसंपादन प्रकरण क्र. ३४/४७/२००७-०८) प्रकरणी भूधारकांना योग्य मोबदला देण्याबाबत स्थानिक लोकप्रतीनिधीनी दिनांक २२ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास जिल्हाधिकारी, अमरावती (भुसंपादन शाखा) यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधीत भूधारकांना योग्य मोबदला देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०७-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) सदरहु प्रकरणी उप विभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, चांदूर रेल्वे यांचेकडे कार्यवाही सुरू असून उक्त प्रकरणात संबंधित यंत्रणेकडून निधी प्राप्त झाला आहे. या प्रकरणामध्ये समाविष्ट भूधारकांना मोबदला वाटपाबाबत नोटीसा काढण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव शहर व ग्रामीण भागासाठी स्वतंत्र तहसीलदार मिळणेबाबत**

**(४६) ८२४६९ (१२-०४-२०१७). श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहराचा मोठ्या प्रमाणात विस्तार होत असल्याने शहर भागासाठी व ग्रामीण विभागासाठी स्वतंत्र तहसीलदार नेमण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी उपविभागीय कार्यालयाने याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठवला असून सदर प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०७-२०१७)** :(१), (२), व (३) होय, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार सद्य:स्थितीत नवीन पद निर्मितीस शासनाने बंधन घातलेले आहे. त्यानुषंगाने नवीन अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याकरीता आवश्यक असणारी पदे ही शासनाच्या प्रचलित धोरणानुसार आकृतीबंधाच्या आढाव्याअंती अतिरिक्त ठरणाऱ्या पदांचे समायोजन करुन उपलब्ध करुन देणे शक्य आहे का याबाबत छाननी झाल्यानंतर निर्णय घेण्याचे योजिले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रुद्रवाडी व पश्चिम तांडा (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) या गावांना स्वतंत्र महसूली दर्जा मिळणेबाबत**

**(४७) ८२५६६ (१२-०४-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रुद्रवाडी व पश्चिम तांडा (ता.लोहारा, जि.उस्मानाबाद) या गावांना स्वतंत्र महसूली दर्जा मिळणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांच्याकडे दिनांक ०४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०७-२०१७) :**(१) व (२) अशा आशयाचे निवेदन लोकप्रतीनिधींकडून प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम ४ मध्ये महसूल विभाग, जिल्हे, महसूली उप विभाग, तालुके, महसूली गावे या महसुली क्षेत्रांचे रचना करण्याची तरतूद आहे. त्यानुसार ३०० किंवा त्यापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वाडया/ तांडे/ वस्त्या यांना स्वतंत्र महसूली गावांचा दर्जा देण्याबाबतचे अधिकार शासन अधिसूचना क्र. टिएलसी/१०७६/६३९२३/म-६, दिनांक ०१.०७.१९७६ व शासन परिपत्रक क्र. टिएलसी १०८५/ ५७६८-प्रक्र ७२/८५/म-१०, दिनांक १८.०५.१९८५ अन्वये अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार जिल्हास्तरावर सदर प्रकरणी कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्याचे विभाजन करून मोर्शी जिल्हा निर्माण करण्याबाबत**

**(४८) ८३३४८ (१२-०४-२०१७). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्याचे विभाजन करून मोर्शी, वरुड, तिवसा, चांदूरबाजार या तालुक्यासह प्रस्तावित असणाऱ्या नेरपिंगालाई व शेंदूरजना घाट या तालुक्यांचा समावेश करून मोर्शी जिल्हा घोषित करण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी मा. मुख्य सचिव यांचेकडे दिनांक २१ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्याचे विभाजन करतानाच मोर्शी व वरुड तालुक्यांचे विभाजन करून नवीन नेरपिंगालाई व शेंदूरजना घाट हे तालुके निर्माण करण्याची मागणीही सदर लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१८-०७-२०१७) :**(१), (२) व (३) होय, जिल्हा विभाजनाबाबत निकष निश्चित करण्याकरीता अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून तपासणीअंती धोरणात्मक निर्णय घेण्याची कार्यवाही सुरु आहे. मंत्रीमंडळाच्या मान्यतेने निश्चित केल्या जाणाऱ्या धोरणानुसार / निकषानुसार अमरावती जिल्ह्याचे तसेच अन्य जिल्ह्यांचे विभाजन / पुनर्रचने संदर्भात प्रकरणपरत्वे उचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त

झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून त्यानुषंगाने धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनस्तरावर सुरु आहे. धोरणात्मक निर्णय झाल्यानंतर प्रकरणपरत्वे निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा न मिळाल्याबाबत

**(४९) ८३४६४ (१५-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील साकत प्रकल्पासाठी शासनाकडून सन १९९३ साली शेतकऱ्यांच्या शेतजमिनी संपादित केल्या होत्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.उच्च न्यायालय व मा.उपविभागीय अधिकारी भूम यांनी मावेजा मंजूर करुनही ३ शेतकऱ्यांना २४ वर्षे उलटूनही अद्यापपर्यंत मावेजा मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील शेतकऱ्यांना लवकरात लवकर मावेजा मिळावा याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री व मा.मदत व पुनर्वसन मंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त तीन शेतकऱ्यांना मावेजा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०७-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) सदर प्रकरणातील तीन शेतकऱ्यांना अग्रीम, अंतिम मोबदला व कलम २८अ खालील वाढीव मावेजाची रक्कम जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचे कार्यालयाकडून वेळेवर वाटप केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील अनाळा-वाटेफळ रस्त्याची झालेली दुरवस्था

**(५०) ८३५०१ (१२-०४-२०१७). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परांडा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील अनाळा-वाटेफळ हा ७ कि.मी.चा रस्ता नादुरुस्त होऊन वाहतुकीस अयोग्य झाल्याने या रस्त्यावर सतत किरकोळ अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०७-२०१७)** :(१) हे खरे नाही. प्रश्नांकित रस्ता हा अनाळा-वाटेफळ प्रजिमा-१ चा भाग आहे. या रस्त्याची एकूण लांबी ३८.९०० किमी आहे. प्रश्नात नमूद अनाळा व वाटेफळ या दरम्यानच्या रस्त्याच्या भागाची लांबी ५.८० किमी आहे. या लांबीतील रस्त्याची सुधारणा करण्याचे काम करण्याचे आदेश कंत्राटदारांना देण्यात आले आहेत. निविदेतील तरतूदी व निधीच्या उपलब्धतेप्रमाणे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत रस्त्यावरून वाहतूक सुरळीत सुरू आहे.
(२) होय. निवेदन प्राप्त आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.